सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एमआयएस- ०१२२/प्र.क्र.१/२०२२/२८ दिनांक: २१ एप्रिल, २०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- विशिष्ट शैक्षिणक अर्हता आणि / अथवा अनुभवावर आधारित सरळसेवा भरतीकरिता आयोजित मुलाखतीबाबत**

विषयांकित पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिध्द खालील जाहिरातीस अनुसरून त्यांच्यासमोर नमूद केल्याप्रमाणे आयोगाच्या त्रिशूल गोल्ड फिल्ड, बेलापुर, नवी मुंबई येथील मुख्य कार्यालयात मुलाखती आयोजित करण्यात येतील :-

| अ.क्र | जाहिरात क्रमांक | संवर्गाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ०९/२०२० | सहसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय गट-अ, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| २ | ११७/२०२२ | भिषक, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ३ | ११८/२०२२ | शल्यचिकित्सक, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ४ | ११९/२०२२ | अस्थिव्यंग शल्यचिकित्सक, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ५ | १२०/२०२२ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्रज्ञ, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ६ | १२१/२०२२ | बालरोग तज्ञ, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ७ | १२२/२०२२ | नेत्ररोग तज्ञ, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजत, |
| ८ | १२६/२०२२ | मनोविकारतज्ञ, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ९ | १२७/२०२२ | कान, नाक, घसा तज्ञ, विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ, सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ मे,२०२३ सकाळी १०.०० वाजता |

२. मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवरील उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे मुलाखत पत्र उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. मुलाखतीचा दिनांक संबंधित उमेदवारांना लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येत आहे.

५. सहसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, गट अ, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, (जाहिरात क्रमांक ०९/२०२०) या संवर्गाचे उमेदवार वगळता अन्य ८ संवर्गाच्या मुलाखतीशी निगडीत उमेदवारांनी त्यांच्या मूळ

कागदपत्र पडताळणीकरीता आयोगाच्या नवी मुंबई येथील कार्यालयात दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी देखील सकाळी १० वाजता मूळ कागद पत्रांसह उपस्थित रहावे.

६. जाहिरातीस अनुसरून पात्रते संदर्भात केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित नमुन्यातील व वैध सर्व मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे मुलाखतीच्या दिवशी तसेच प्रमाणपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य आहे.

७. पात्रतेच्या अनुषंगाने विहित नमुन्यातील सर्व प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल. तसेच मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्याकरिता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : २१ एप्रिल, २०२३

उप सचिव (सरळसेवा - निकाल)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग